जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 OCT 2019
Times of India

# 10 students from SUK clear Japanese language test

TOI



Students holding their Japanese Language Proficiency certificates

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Ten students of the Department of Foreign Languages of the Shivaji University, Kolhapur (SUK), cleared the Japanese Language Proficiency Test recently, read a press statement from the university. Purva Nadgonda, one of the students, scored 94% in the test.

Megha Pansare, the head of the Foreign Languages Department, said that the JLPT certificates offer various advantages, ranging from recognition as academic credit and graduation certification at schools to preferential treatment at companies and acknowledgement of qualification in society.

## CAMPUS BUZZ

### DKTE college gets Best Pvt Engineering College award

Ichalkaranji-based DKTE Society's College of Textile Engineering Institute was recently awarded with the Best Private Engineering College award in a networking event organized in Bengaluru. The institute's director Dr P V Kadole was also awarded with the 'Director of the Year' award, it added.

### World Bioethics Day at D Y Patil Education Society

City-based D Y Patil Education Society observed the World Bioethics Day on October 18, read a press statement from the college. It added that cultural diversity plays an integral role in holistic development of the society, and with this view in mind, the day was celebrated at the college.

### Cyber security workshop at Vivekanand College

A one-day workshop on cyber security was organized at the city-based Vivekanand College recently, read a press statement from the college. It added that the experts delivered the lecture on the importance of the anti-virus in the computer systems and how to avoid malware and other spam files in the systems.



लंडन येथील ब्रिस्टल विद्यापीठातून समाजशास्त्र विषयातील उच्चपदवी परीक्षेत यश मिळवून कोल्हापुरात परतलेल्या नवीन राऊत यांच्या सत्कार प्रसंगी श्रीमंत छत्रपतीशाहू महाराज.

# नवीन राऊतचे लंडन विद्यापीठात यश

कोल्हापूर टाइम्स टीम

जेमतेम आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणासाठी कराव्या लागलेल्या संघर्षाचे चीज करत राजारामपुरीतील मातंग वसाहतीत राहणाऱ्या नवीन मुरलीधर राऊत या युवकाने लंडन येथील ब्रिस्टल विद्यापीठात सामाजिक शास्त्र विषयातून पदवी मिळवली. 'जगभरातील सामाजिक असमानता आणि त्यासाठी जगभरातील सामाजिक आंदोलने', या विषयाचा नवीन यांनी अभ्यास केला.

श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांच्याहस्ते नवीन यांचा नुकताच सत्कार करण्यात आला. तत्पूर्वी नवीनच्या यशाबद्दल मिरवणूक काढण्यात आली. बिंदू चौक, राजाराम रोड, शाहू मिल चौकमार्गे राजामपुरीतील साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले.

नवीनचे वडील मुरलीधर राऊत शिवाजी विद्यापीठात शिपाई म्हणून काम करतात. गरीब परिस्थितीमुळे लहानपणापासूनच नवीन यांना प्रतिकूल आर्थिक परिस्थितीत शिक्षण घ्यावे लागले. ओरिएंटल इंग्लिश स्कूलमधून नवीन यांनी दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले तर मुक्त विद्यापीठातून समाजशास्त्र विषयातील बीएची पदवी घेतली. नोकरी करतच त्यांनी परदेशात उच्च शिक्षण घेण्याचे स्वप्न पाहिले.

यावेळी नगरसेवक संदीप कवाळे, माजी नगरसेवक शिवाजी कवाळे, सुभाष विरांजे, कुमार दाभाडे, दावीद भोरे, प्रमोद घाटगे, निशांत दावणे, सागर बुचडे, सुरेश अवघडे, मुरलीधर राऊत, मधुकर राऊत आदी उपस्थित होते.

# देशात ३७२ नवीन प्राण्यांच्या प्रजाती

## महाराष्ट्रातील ३८ प्रजातींचा समावेश; प्राणी सर्वेक्षणचा अहवाल

**औरंगाबाद : जितेंद्र विसपुते**

देशात गेल्या वर्षी तब्बल ३७२ नवीन प्राण्यांचा शोध लागला आहे, ज्या प्राणिशास्त्रासाठी नवीन आहेत. यात महाराष्ट्रातील तब्बल ३८ प्रजातींचा समावेश आहे. भारतीय प्राणी सर्वेक्षणकडून (झूलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया/झेडएसआय) 'ॲनिमल डिस्कव्हरीज २०१८' हा १४३ पानी अहवाल नुकताच प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. यातून ही सकारात्मकता समोर आली आहे.

झेडएसआयकडून दरवर्षी देशात आढळून आलेल्या नवीन प्राण्यांच्या नोंदीचे, शोधांचे संकलन केले जाते आणि त्याबाबतचा अहवाल प्रसिद्ध केला जातो. केंद्रीय पर्यावरण, वने आणि हवामान बदल मत्रालयांतर्गत असलेली ही शासकीय संस्था आहे. महाराष्ट्रातील या संस्थेचे कार्यालय पुणे येथे आहे. झेडएसआयने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार मागील वर्षी सबंध विज्ञान विश्वासाठी नवीन असलेले तब्बल ३७२ प्राणी देशात सापडले. या प्रजातींमध्ये समुद्रजीव, जंतवर्गीय, गांडूळसदृश, कोळीवर्गीय, खेकडे, कीटक, लवचिक अस्थिजन्य, मासे, उभयचर, सरीसृप, एकपेशीय, पृष्ठवंशीय, अपृष्ठवंशीय या वर्गातील प्राण्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे यात ४४ प्रजाती महाराष्ट्रातून शोधण्यात आलेल्या आहेत.

एकूण प्रजातींपैकी **पान ७ वर ▸**

### महाराष्ट्रातील प्रजातींची नोंद कोल्हापूर, साताऱ्यातून

महाराष्ट्रातून नोंद झालेल्या नवीन प्राण्यांच्या प्रजाती कोल्हापूर, मुंबई, सातारा, सिंधुदुर्ग, पुणे, रत्नागिरी जिल्ह्यांतून नोंदविण्यात आलेल्या आहेत. ३७२ पैकी ३११ इनव्हर्टीब्रेटस् (पाठीचा कणा नसलेले प्राणी) आणि ६१ प्राणी व्हर्टीब्रेटस् (कणा असलेले) आहेत. व्हर्टीब्रेटस्पैकी ३० प्रजाती या सरपटणाऱ्या प्राण्यांच्या, २१ प्रजाती माशांच्या आहेत. ९ प्रजाती उभयचर, १ प्रजाती स्तनपायीची उपप्रजाती आहे. पश्चिम घाटामध्ये ५९ प्रजाती आढळल्या आहेत.

# देशात ३७२ नवीन प्राण्यांच्या प्रजाती

**(पान १ वरून)** १०३ प्रजाती झेडएसआयच्या शास्त्रज्ञांनी शोधल्या आहेत. तर उर्वरित प्रजाती विविध संस्था आणि संशोधकांकडून नोंदवण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्रात आढळून आलेल्या ३८ प्रजातींत कीटक, पाली, मासे, खेकडे आणि माशांच्या प्रजातींचा समावेश आहे.

**१३९ प्राण्यांच्या प्रजाती भारतात पहिल्यांदाच**

अहवालानुसार १३९ प्राण्यांच्या प्रजाती अशा आहेत, ज्यांची विज्ञान विश्वात नोंद आहे; मात्र भारतात त्या पहिल्यांदाच आढळून आलेल्या आहेत. यात स्पंजेस (४), लवचिक अस्थिजन्य (५), जंतवर्गीय (११), सूक्ष्मजीव (१), खेकडे (२२), कीटक (४७), समुद्रीजीव (११), अपृष्ठवंशीय (४), एकपेशी (१), उभयचर (१), पिसेस (११), पक्षी (११), सस्तन प्राणी (१) या प्रजातींचा समावेश आहे.